**<u>मा.मु.का.अ. संदर्भ</u>** जाक्र.जिपसो/शिक्षण/प्राआ-३/४२९/१०
**महत्वाचे / वेळेचे बंधन** सोलापूर दि.१७/०९/२०१०

प्रति,

१) **गटशिक्षणाधिकारी,**
पंचायत समिती -----------------------------

२) **प्रशासनाधिकारी,**
म.न.पा. प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

३) **प्रशासनाधिकारी,**
न.पा.प्रा. व शिक्षण मंडळ, अक्कलकोट, बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा, करमाळा, कुर्डूवाडी

**विषय :- शिक्षण विस्तार अधिकारी (श्रेणी-३) मराठी पदोन्नत्ती सेवाजेष्ठता यादीबाबत . . .**

संदर्भ :- या विभागाकडील पत्र क्र.जिपसो/शिक्षण/प्राआ-३/२४७/१० सोलापूर दि.२२/०६/१०

वरील विषयानुसार आपणांस कळविणेत येते की, या विभागाकडील शिक्षण विस्तार अधिकारी (श्रेणी-३) (माध्यम : मराठी) ची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. नियमानुसार सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका व ०६ नगर पालिका या कार्यालयाकडील यापूर्वी व आता प्राप्त झालेल्या सेवाजेष्ठता यादीनुसार मराठी माध्यमाची आवश्यकतेएवढी सेवा जेष्ठता यादी या पत्रासोबत जोडून पडताळणी करिता देण्यात येत आहे. कृपया सदर यादीचे अवलोकन होवून खाली सूचनेनुसार पडताळणी करुन अहवाल दि.२४/०९/२०१० रोजी आस्थापना लिपिकामार्फत अथवा खास दूतामार्फत या कार्यालयात समक्ष सादर करावा.

१) सोबतच्या यादीतील कर्मचारी आपल्याच विकास गटात कार्यरत आहे काय? नसलेस सध्या कोणत्या विकास गटात कोणत्या पदावर कार्यरत आहे याबाबत माहिती सादर करावी.

२) यादीतील कर्मचारी सेवाजेष्ठतेनुसार शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी-३ या पदोन्नतीस पात्र आहे काय? तसेच सोबतची सेवाजेष्ठता यादी बरोबर आहे काय याबाबत खात्री करावी.

३) सोबतच्या यादी व्यतिरिक्त आपल्या विकास गटातील एखादा कर्मचारी सेवाजेष्ठतानुसार शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी-३ पदोन्नतीस पात्र आहे. परंतु त्याचे नांव सेवाजेष्ठता यादीत समाविष्ट नसलेस अशा पात्र कर्मचाऱ्याचे नांव नव्याने स्वतंत्र सेवाजेष्ठता यादी तयार करुन ती यादी दि.२४/०९/२०१० पर्यंत या आस्थापनेकडे सादर करावा. या तारखेनंतर दुरुस्ती यादी स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी. या तारखेनंतर प्राप्त होणारे अहवाल किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही तसेच पात्र कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विकास गटातील आस्थापना लिपिक व संबंधित ग.शि.अ. यांची राहील. तसेच या विभागाने प्रसिध्द केलेली सेवाजेष्ठता यादी बरोबर आहे असे गृहीत धरले जाईल याची नोंद घ्यावी.

४) सोबतच्या सेवाजेष्ठता यादीतील कर्मचाऱ्याचे नांव, जन्मतारीख, मूळ नेमणूक तारीख, पदनाम, शैक्षणिक पात्रता, जात, संवर्ग, सध्याची कार्यरत शाळा व तालुका याबाबत व्यवस्थित व काटेकोरपणे पडताळणी करावी व मुदतीत अहवाल सादर करावा.

५) सेवाजेष्ठता यादीतील कर्मचारी सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्त, मयत, बडतर्फ, निलंबित, खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित आहे काय याबाबत पडताळणी करुन मुदतीत अहवाल सादर करावा.

६) सेवाजेष्ठता यादीतील कर्मचारी आंतरजिल्हा बदलीने या विभागाकडे हजर झाले असलेस किंवा बदलून गेला असल्यास तसे नमूद करुन हजर दिनांक, शेरा कॉलममध्ये नमूद करावे व दुरुस्ती केलेली यादी दिनांक २४/०९/२०१० रोजी सादर करावा.

७) तसेच सोबतच्या सेवाजेष्ठता यादीतील जे कर्मचारी सध्या ज्या मागासवर्गीय प्रवर्गात कार्यरत आहे त्या प्रवर्गातील मूळ जात वैधता प्रामणपत्र संबंधित आस्थापना लिपिका मार्फत या आस्थापनेकडे दि.२४/०९२०१० रोजी सादर करावेत किंवा ज्यांचे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही त्यांचे नियमानुसार आवश्यक ते कागदपत्रे उपलब्ध करुन गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचेमार्फत मा.सदस्य सचिव जाती पडताळणी समिती, पुणे यांचेकडे सादर करावे व तसा अहवाल या विभागाकडे दिनांक २४/०९२०१० रोजी सादर करावा.

८) विशेषत: सोबतच्या सेवाजेष्ठता यादी व्यतिरिक्त एखादा शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी-३ मराठी माध्यमाचा पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांचा नांव या विभागास विहीत मुदतीत म्हणजे दि.२४/०९/२०१० पर्यंत सादर केले नाही किंवा नांव समाविष्ट नसलेने पात्र कर्मचारी पदोन्नती पासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विकास गटातील आस्थापना लिपिक व संबंधित गटशिक्षणाधिकारी तसेच म.न.पा. व न.पा. चे प्रशासनाधिकारी यांची राहील व होणाऱ्या सर्व परिणामास ते वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

९) सोबतच्या यादीतील सेवाजेष्ठता यादी योग्य असलेस तसा अहवाल दि.२४/०९/२०१० रोजी सादर करावा.

१०) सदरची पदोन्नती ही समुपदेशनाद्धारे होणार असलेने यामध्ये कोणतीही अनियमितता होणार नाही याची आस्थापना लिपिकांनी / गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

११) तसेच सदरची सेवाजेष्ठता यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबत जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी नोंद घ्यावी व काही आक्षेप / त्रुटी किंवा सेवाजेष्ठतेबाबत तक्रार असल्यास आपल्या विकास गटातील गटशिक्षणाधिकारी मार्फत या विभागाकडे दि.२४/०९/२०१० पर्यंत अहवाल सादर करावा. या तारखेनंतर प्राप्त होणारे अहवाल किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही तसेच या विभागाने प्रसिध्द केलेली सेवाजेष्ठता यादी बरोबर आहे असे गृहीत धरले जाईल याची नोंद घ्यावी.

तेंव्हा वरील १ ते ११ मुद्यांनुसार सेवाजेष्ठता यादी पडताळणी करुन पडताळणी व दुरुस्त केलेली यादी तसेच जर नव्याने नांवे समाविष्ट केली असलेस सदरची यादी गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीने व दुरुस्त यादीवर गटशिक्षणाधिकारी यांची यादी तपासले व बरोबर आहे असा शेरा घेवून व स्वाक्षरी घेवून मुखपृष्ठासह यादी व अहवाल दि. २४/०९/२०१० रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत या आस्थापनेकडे समक्ष सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

प्रत :- सनियंत्रण संगणक कक्ष, जि.प. सोलापूर

२/- सदरचे पत्र व सोबतची सेवाजेष्ठता यादी जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर कृपया प्रसिध्द करावी.

प्रत:- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना माहितीस्तव सविनय सादर

## विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ (मराठी माध्यम)

## पदोन्नतीकरिता तात्पुरती सेवाजेष्ठता यादी सप्टेंबर-२०१० अखेर (पडताळणीकरिता प्रसिध्द)

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे ाांव | जमतारीख | मूळ ोमणूक तारीख | जात | संवर्ग | पदााम | शाळा/केंद्र | तालुका | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **खुला प्रवर्ग** | | | | | | |
| १ | श्री द.म.मोरे | ०१/०६/१९५३ | १७/०१/१९७३ | मराठा | खुला | उ.शि. | | पंढरपूर | डी.एड. | |
| २ | श्री म.श्री.शिंदे | ०४/०३/१९५३ | १८/०१/१९७३ | मराठा | खुला | मुख्या. | बोचरे वस्ती | पंढरपूर | डी.एड. | |
| ३ | सौ.सु.सु. गाढवे | २८/०७/१९५४ | १३/०५/१९७३ | मराठा | खुला | कें.प्र. | काटेगांव | बार्शी | बी.ए. बी.एड | |
| ४ | श्रीम. रे.भ. देशपांडे | १९/०९/१९५३ | ०६/०७/१९७३ | ब्राह्मण | खुला | कें.प्र. | सदाशिवागर | माळशिरस | बी.ए. बी.एड | |
| ५ | श्री म.भी.पोरे | ०७/०१/१९५३ | ०७/०७/१९७३ | शिंपी | इमाव | उ.शि. | बोंडले | माळशिरस | डी.एड. | |
| ६ | श्री पु.च. चौगुले | ०७/०८/१९५३ | ०७/०७/१९७३ | लिंगायत | खुला | मुख्या. | | पंढरपूर | डी.एड. | |
| ७ | श्रीम कु.द. पवार | ०१/०६/१९५३ | १४/०७/१९७३ | मराठा | खुला | मुख्या. | चिखर्डे (मुले) | बार्शी | डी.एड. | |
| ८ | श्रीम प्र.ध. शेंडे | ०६/११/१९५४ | १८/०७/१९७३ | लिंगायत | खुला | कें.प्र. | | मंगळवेढा | बी.ए. डी.एड | |
| ९ | श्री स.तु. वाघमारे | ०३/१०/१९५३ | २०/०७/१९७३ | माळी | इमाव | मुख्या. | विठ्ठलवाडी | पंढरपूर | डी.एड. | |
| | | | | **मागासवर्गीय आुशेष (विमाप्र)** | | | | | | |
| १ | श्री ाा.भ. लोखंडे | २४/०६/१९५३ | १२/१०/१९७३ | कोष्टी | विमाप्र | मुख्या. | सौंदणे | माळशिरस | डी.एड. | |
| २ | श्री शि.गु. हारके | ०१/०५/१९५३ | १३/१०/१९७३ | कोष्टी | विमाप्र | उ.शि. | पाटीलवस्ती | करमाळा | डी.एड. | |
| | | | | **मागासवर्गीय आुशेष (भ.ज.क.)** | | | | | | |
| १ | श्री उ.शा.पाटील | ०१/०६/१९५४ | १३/१०/१९७३ | धागर | भजक | उ.शि. | | माळशिरस | डी.एड. | |
| २ | श्री ब.सो. काळे | ०१/०६/१९५५ | १५/१०/१९७३ | धागर | भजक | मुख्या. | पाटकुल | मोहोळ | डी.एड. | |